REGD OFFICE: 105, HIRANANDANI INDUSTRIAL ESTATE, OPP. KANJURMARG RAILWAY STATION, KANJURMARG (WEST), MUMBAI - 400 078
Tel: 02225839500 CIN: L29299MH1997PLC105108 **Email: investors@chemtechvalves.com**

Extract Statement of Audited Financial Results for the quarter, half year and year ended March 31, 2021

(Rs. In Lakhs) Except EPS

Sr. No.	Particulars	For the Quarter Ended 31/03/2021 (Audited)	For the Quarter Ended 31/12/2020 (Unaudited)	For the Quarter Ended 31/03/2020 (Audited)	For the year Ended 31/03/2021 (Audited)	For the year Ended 31/03/2020 (Audited)
1	Total Income from Operations (Net)	391.21	417.67	146.17	1405.50	1979.72
2	Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items)	13.88	40.78	-42.80	65.68	94.30
3	Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/ or Extraordinary items)	13.88	40.78	-42.80	65.68	94.30
4	Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items)	14.66	41.21	(50.42)	68.39	97.13
5	Total Comprehensive Income for the period (after tax) and Other Comprehensive	14.66	41.21	(50.42)	68.39	97.13
6	Paid up equity share Capital	1148.73	1,148.73	1,148.73	1148.73	1,148.73
	(Face value Rs.10 per share)					
7	Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year	-	-	-	(206.48)	(282.55)
8	Earning per share (EPS) FV of Rs.10/- each					
	(a) Basic EPS	0.13	0.36	-0.44	0.60	0.85
	(b) Diluted EPS	0.13	0.36	-0.44	0.60	0.85

Note: The above is an extract of the detailed format of Audited Financial Results for the quarter, half year and year ended on March 31, 2021 filed with the stock exchange under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Audited Financial Results for the quarter, half year and year ended March 31, 2020 are available on Stock Exchange websites viz., (www.bseindia.com) and Company's website (www.chemtechvalves.com).
The audited results are approved by the Board of Directors of the Company at their meeting held on 29th May, 2021

For Chemtech Industrial Valves Limited
sd/-
Harsh Pradeep Badkur
Managing Director
Place: Thane **DIN:00676715**
Date:29.05.2021

Tips Industries Limited

tips.in

CIN: L92120MH1996PLC099359
Regd. Office: 601, 6th Floor, Durga Chambers, Linking Road, Khar (W), Mumbai 400 052
Tel No.: +91-22-66431188
Fax No.: +91-22- 66431189,
Email: response@tips.in Website: www.tips.in

NOTICE

Transfer of Equity Shares of the Company to Investor Education & Protection Fund (IEPF) Authority

NOTICE is hereby given that in compliance with the provisions of Sections 124(6) and 125 of the Companies Act, 2013 read with the Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules ("Rules"), 2016 as amended from time to time, the Company is required to transfer the shares, in respect of which dividend remains unpaid or unclaimed for a period of seven consecutive years or more, to the IEPF Account.

The Company has sent communication to the concerned shareholders who have not encashed their dividend for the financial year 2013-2014 and all subsequent dividends declared and paid by the Company, Shares of concerned folio are liable to be transferred to IEPF Account as per the said Rules.

The Company has uploaded full details of such shareholders and shares due for transfer to IEPF Authority on the website of the Company at www.tips.in

The concerned shareholders are requested to claim the unpaid/unclaimed dividend amount(s) on or before September 12, 2021 failing which their shares shall be transferred to IEPF Authority. Please note that no claim shall lie against the company in respect of unclaimed dividend amount and equity shares transferred to IEPF, pursuant to the IEPF rules.

In case the shareholders have any queries on the subject matter and the Rules, they may contact the Company's Registrar and Transfer Agents at : M/s. Link Intime India Pvt. Ltd., C-101, 247 Park, L.B.S Marg, Vikhroli West, Mumbai - 400 083, Tel No.: +91 22 4918 6270, E-mail: iepf.shares@linkintime.co.in.

For **Tips Industries Limited**
Sd/-
Place : Mumbai **Bijal R. Patel**
Date : May 29, 2021 Company Secretary

आता कोरोना चाचणीसाठी शहरात जायची गरज नाही, वर्ध्यातील ग्रामीण भागात आरटीपीसीआर टेस्टची सोय

वर्धा, दि. ३०, (प्रतिनिधी) : कोरोना रुग्णांच्या निदानाकरिता आरटीपीसीआर चाचण्यादेखील करण्यात येत आहेत. आता गावपातळीवरील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आरटीपीसीआर चाचण्यांसाठी नमुने घेण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे आता ग्रामीण भागातील आरटीपीसीआरकरिता स्त्राव संकलन करत कोरोना रुग्णांचे निदान केले जाणार आहे.

मागील वर्षभरापासून कोरोनाच्या अनुषंगाने शासनाकडून वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येत आहेत. उपाययोजनांसोबतच चाचण्या वाढविण्यावर भर देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. कोरोनाच्या अँटिजेन, आरटीपीसीआर अशा दोन पद्धतीच्या चाचण्या करण्यात येत आहेत.

जिल्हा सामान्य रुग्णालय, हिंगणघाट, आर्वीचे उपजिल्हा रुग्णालय, सेवाग्राम, सावंगी, ग्रामीण रुग्णालयातच आरटीपीसीआर चाचणीची सुविधा उपलब्ध होती. काही प्रसंगी शिबिर घेऊन तपासणी केली जायची. शहरानंतर ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात कोरोनाबाधित रुग्ण आढळू लागल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर आरटीपीसीआर चाचणीसाठी स्त्राव घेण्याची सुविधा उपलब्ध करण्याची गरज पुढे येऊ लागली. त्या अनुषंगाने आता प्राथमिक आरोग्य केंद्रांत आरटीपीसीआर चाचणीसाठी स्त्राव घेण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांचा शहरस्थळी जाऊन चाचणी करण्याचा त्रास कमी होणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांत ही सुविधा उपलब्ध झाल्याने त्या केंद्राच्या परिसरातील गावांतील रुग्णांचे निदान करण्यास मदत होणार आहे.

२७ आरोग्य केंद्रांत याबाबत प्रशासनाच्या वतीने आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. येथे स्त्राव घेऊन सेवाग्राम, सावंगी येथील प्रयोगशाळेत तपासणीकरिता पाठविण्यात येणार आहे.

जानकीदेवी बजाज ग्रामविकास संस्थेकडूनही याकरिता हातभार लावण्यात आला आहे. या सुविधेकरिता संस्थेकडून आठ लाख रुपये उपलब्ध करण्यात आलेत. रोज किमान ५० चाचण्या व्हाव्यात, असे उद्दीष्ट देण्यात आले आहे.

नागरिकांनी चाचणी करून घ्यावी : ओम्बासे

आरोग्य वर्धिनी केंद्रांत आरटीपीसीआर चाचणीसाठी सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. यातून ग्रामीण भागातील रुग्णांचे निदान लवकर होण्यास मदत होणार आहे. नागरिकांनी तपासणी करुन घ्यावी, अशी प्रतिक्रिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी व्यक्त केली.

नाशिक जिल्ह्यात १० हजार ४९५ रुग्णांवर उपचार सुरू

नाशिक, दि. ३० (हिंदुस्थान समाचार) : जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत आज प्राप्त अहवालानुसार जिल्ह्यातील ३ लाख ६१ हजार ६५२ कोरोना बाधीतांना डिस्चार्ज देण्यात आला असून सद्यस्थितीत १० हजार ४९५ रुग्णांवर उपचार सुरु आहेत. तसेच उपचार सुरू असलेल्या रुग्णांमध्ये १ हजार ४९२ ने घट झाली आहे. आत्तापर्यंत ४ हजार ६३७ रुग्णांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती जिल्हा नोडल अधिकारी डॉ. अनंत पवार यांनी दिली आहे. उपचार घेत असलेले पॉझिटिव्ह रुग्ण: नाशिक ग्रामीण मध्ये नाशिक ७२३, बागलाण ३६०, चांदवड ४०३, देवळा २३३, दिंडोरी ४७२, इगतपुरी ९७, कळवण ३२८, मालेगाव ३२२, नांदगाव २९८, निफाड ४४१, पेठ ४४, सिन्नर ६१२, सुरगाणा १३०, त्र्यंबकेश्वर ३६, येवला १०६ असे एकूण ४ हजार ७०७ पॉझिटिव्ह रुग्णांवर उपचार सुरू आहे. तसेच नाशिक महानगरपालिका क्षेत्रात ४ हजार ७४१, मालेगांव महानगरपालिका क्षेत्रात ९९३ तर जिल्हाबाहेरील ५६ रुग्ण रुग्ण आढळून आले .

'म्युकर'च्या ४३९ रुग्णांसाठी आले औषध

नागपूर, दि. ३०, (प्रतिनिधी) : कोरोना होऊन गेलेल्यांना म्युकरमायकोसिस हा आजार होत असून जिल्ह्यात रुग्णसंख्या वाढत आहे. जिल्ह्यातील ८९ रुग्णालयांत भरती असलेल्या ४३९ रुग्णांसाठी गुरुवारी १ हजार १५० अँम्फोटेरिसिन-बी इंजेक्शनचे वितरण करण्यात आले. सध्या या इंजेक्शनचा तुटवडा जात असल्याने इंजेक्शनसाठी मोठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

म्युकरमायकोसिस हा काळ्या बुरशीसारखा असतो. हा आजार केवळ डोळ्यांमध्ये नाही तर मेंदू, हिरड्यांमध्ये तसेच छातीतदेखील होऊ शकतो. डोळ्याच्या वरच्या पापणीला सूज येणे, पापणी खाली येणे, डोळा पुढे आल्यासारखा वाटणे, डोळ्यांभोवतीची त्वचा काळसर होणे, डोळ्यांची हालचाल मंदावणे, दोन वस्तू दिसणे, नाकावर सूज येणे, चेहऱ्यावर एका बाजूने सूज, डोळ्यांमध्ये वेदना, चावताना दात दुःखणे ही या आजाराची लक्षणे आहेत. या आजारावर देण्यात येणारे एक इंजेक्शन ७ ते ८ हजारांच्या घरात आहे. एका रुग्णाला दिवसाला किमान ५ याप्रमाणे १५ दिवसांसाठी ७५ इंजेक्शन द्यावे लागतात. गुरुवारी इंजेक्शन मिळाल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळाला.

२६ हजार ५८० लशीही आल्या

लशींचाही पुरवठा संथगतीने होत असल्याने जिल्ह्यातील लसीकरण मोहिमेचा वेग मंदावला आहे. गुरुवारी २६ हजार ५८० लशी जिल्ह्याला प्राप्त झाल्या. यात कोव्हीशिल्डच्या २४ हजार ७०० लशी व कोव्हॅक्सिनच्या १८८० लशी आहेत. शहरात आणि ग्रामीणमध्ये लशींचे समसमान वाटप करण्यात आले.

गुरुवारी ९६ मेट्रिक टन ऑक्सिजनही प्राप्त झाला. त्यापैकी ६४ मेट्रिक टन वितरण खासगी व शासकीय कोव्हिड रुग्णालय व प्लांटसला करण्यात आले. रेमडेसिव्हिरची मागणी कमी झाल्याने केवळ १६ रेमडेसिव्हिर गुरुवारी प्राप्त झाल्या.

कोरोनात निराधार, विधवा झालेल्या महिलांसाठी योजना आखा, आमदार राजू पारवेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र

नागपूर, दि. ३०, (प्रतिनिधी) : उमरेडचे काँग्रेसचे आमदार राजू पारवे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना पत्र लिहिलं आहे. 'कोरोनात निराधार, विधवा झालेल्या महिलांसाठी योजना आखा', अशी विनंती त्यांनी या पत्राद्वारे केली आहे. योजना आखून कोरोनामुळे विधवा झालेल्या निराधार महिलांना मदत करा. तसेच, कोरोना निराधार पालकत्व योजना राज्यभर राबवण्याची मागणी आमदार राजू पारवे यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे केली आहे. कोरोनामुळे घरचा कर्ता पुरुष गेल्याने अनेक परिवारावर संकट ओढवलं आहे, त्यामुळे राजू पारवे यांनी ही मागणी केली आहे.

घरचा कर्ता पुरुष गमावल्याने अनेक कुटुंब रस्त्यावर

कोरोनाने कधीही भरुन न निघणाऱ्या जखमा दिल्या आहेत. नागपूरच्या ग्रामीण भागात कोरोनामुळे सव्वादोन हजारपेक्षा जास्त जणांचा मृत्यू झालाय. यात तरुणांची मोठी संख्या आहे. विशी, पंचविशीतल्या तरुणी विधवा झाल्याने त्यांच्या जगण्याचा मोठा प्रश्न निर्माण झालाय. कुणी सात महिन्यांची गरोदर आहे तर कुणावर दोन मुलांची जबाबदारी आहे. तर कुणी घरी एकटं पडलं आहे. असे उघड्यावर पडलेले संसार बघून डोळे निश्चितच पाणवतात.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत अनेक तरुणांचा मृत्यू झाल्याने, विशी-पंचविशीतल्या तरुणी विधवा झाल्या आहेत. ही समस्या फक्त नागपूर जिल्ह्यापुरतीच मर्यादीत नाही, तर राज्यभर अशाच प्रकारे अनेक परिवार उघड्यावर आलेय. त्यामुळे आ. राजू पारवे यांच्या प्रमाणेच समाज म्हणून लोकप्रतिनिधी, व्यावसायीक किंवा ज्यांना शक्य आहे, त्यांनी कोरोनाने अशाप्रकारे उघड्यावर आलेल्या कुटुंबियांना आधार देणं गरजेचं आहे.

मंत्री विजय वडेट्टीवार मित्र परिवाराची मदत

कोरोनामुळे घरचा कर्ता पुरुष गमावल्याने अनेक परिवार रस्त्यावर आले आहेत. अशाच निराधार असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी मतदारसंघातील ३५० पेक्षा जास्त कुटुंबांना मंत्री विजय वडेट्टीवार मित्र परिवाराने प्रत्येकी दहा हजारांची मदत केलीय.

चंद्रपुरात दारुबंदी उठवल्याच्या दुसऱ्याच दिवशी ३ कोटीच्या दारुवर रोडरोलर फिरवला

चंद्रपूर, दि. ३०, (प्रतिनिधी) : राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत चंद्रपूर जिल्ह्यातील दारूबंदी उठवण्याचा निर्णय घेतला. यानंतर दुसऱ्याच दिवशी चंद्रपूरमध्ये ३ कोटी रुपयांचा दारूसाठा रोडरोलर खाली घालून नष्ट करण्यात आला. चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस पोलीस ठाण्याच्या हद्दीत अज्ञात ठिकाणी हा दारुसाठा नष्ट करण्यात आला. मागील ३ वर्षात केवळ घुग्घुस पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा ३ कोटी रुपयांचा दारूसाठा पकडण्यात आला होता. एकूण ३८८ दारूच्या गुन्ह्यात हा साठा जप्त करण्यात आला होता. याघडच्या काळातही चंद्रपूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यातील मालखान्यात ठासून भरलेला दारूसाठा नष्ट करण्याची प्रक्रिया सुरूच राहणार आहे.



स्थानिक पोलीस ठाणे आणि उत्पादन शुल्क विभाग अधिकारी यांच्या उपस्थितीत चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई करण्यात आली. नष्ट करण्यात आलेल्या एकूण दारूसाठ्याची किंमत ३ कोटी रुपये इतकी होती. हा दारूसाठा रोडरोलर खाली फोडून नष्ट करण्यात आला. मागील केवळ ३ वर्षात घुग्घुस पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा दारूसाठा पकडल्यानं दारूतस्करांची मजल कुठपर्यंत गेली होती हे लक्षात येतं. मात्र, न्यायालयीन आदेशानुसार आता पोलिसांनी हा संपूर्ण साठा नष्ट करण्याची प्रक्रिया सुरु केलीय, अशी माहिती घुग्घुस पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल गांगुर्डे यांनी दिलीय.

पोलिसांनी केलेल्या कारवाईचे फोटो आणि व्हिडीओ देखील समोर आले आहेत. यात जप्त करण्यात आलेला पोलीस कस्टडीतील दारूसाठा रोडरोलर खाली घालून फोडल्यानंतर त्या ठिकाणी काचांचा ढिग साचलेला दिसत आहे. यानंतर सध्या चंद्रपूरमध्ये दारूबंदी हटवण्याच्या निर्णयासोबत या कारवाईचीही जोरदार चर्चा होत आहे.

विद्यार्थिनीचे अपहरण करून अत्याचाराचा प्रयत्न

नागपूर, दि. ३०, (प्रतिनिधी) : विद्यार्थिनीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचाराचा प्रयत्न करण्यात आला. ही घटना हिंगणा पोलीस ठाण्यांतर्गत समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. चेतन नरेश काकडे (२१), रा. राजीवनगर असे आरोपीचे नाव आहे. तो ऑटोचालक आहे. पीडित १६ वर्षीय मुलगी दहाव्या वर्गात शिकते. कोरोनामुळे शाळा बंद आहे. पण, शाळेचे शुल्क भरण्यासाठी गुरुवारी ती ११ वाजता घरून निघाली व ऑटोने हिंगणा मार्गावरील एका बँकेत गेली. तेथून ती शाळेत गेली. ती बाहेर निघाली असता आरोपी उभा होता. येतानाही तोच होता व जाण्यासाठी त्याने पीडितेला बसायला सांगितले. तेव्हा ऑटोत तिच्याशिवाय दुसरा प्रवासी नव्हता. त्यामुळे आरोपीने इतर प्रवासी शोधण्यासाठी समोर जाण्यासाठी तिला विचारले. त्याने हिंगणा येथील चौकापर्यंत नेले. तेथेही प्रवासी भेटले नाही. त्यानंतर आरोपीचा हेतू वेगळाच होता. तो आऊटर रिंगरोडच्या दिशेने ऑटो घेऊन जात होता. पीडित मुलगी त्याला उतरण्यासाठी विनंती करीत होती. तेव्हा त्याने तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केली. तिने नकार देऊन आरडाओरड केली. त्याने घाबरून ऑटो थांबवला असता ती उतरली व रस्त्याने येणाऱ्या एका व्यक्तीला मदत मागितली. त्या व्यक्तीने तिला पोलीस ठाण्यापर्यंत सोडले. पीडितेने पोलिसांत तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सारीन दुर्गे यांच्या मार्गदर्शनात विनयभंगाचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली.

''तीन दिवसात कारणे दाखवा, अन्यथा...'', जैविक कचरा उघड्यावर फेकून कोरोनाला निमंत्रण देणाऱ्या रुग्णालयाला नोटीस

बुलडाणा, दि. ३०, (प्रतिनिधी) : कोरोना रुग्णालयाती जैविक कचरा हा घातक असतो. त्यामुळे त्याची योग्य विल्हेवाट लावणं जास्त आवश्यक असतं. मात्र, कोरोना रुग्णालयातील हाच कचरा रस्त्यावर उघड्यावर टाकण्यात आल्याचा प्रकार २४ मे रोजी बुलडाण्यात उघड झाला होता. याप्रकरणी शहरातील नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत होती. याशिवाय या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेऊन नगरपरिषद अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला होता.

जैविक कचरा संचेती कोविड हॉस्पिटलचा

नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासात रस्त्यावरचा जैविक कचरा हा संचेती कोविड हॉस्पिटलचा असल्याचं निष्पन्न झालं आहे. याप्रकरणी नगरपरिषदेने संचेती हॉस्पिटलला तीन दिवसात कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यानंतर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया केली जाईल, असं नगरपरिषदेने सांगितलं आहे.

अज्ञातांकडून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न

रस्त्यावर उघड्यावर ज्या भागात जैविक कचरा टाकण्यात आला आहे त्याठिकाणी भंगार गोळा करणाऱ्या व्यक्ती मास्क आणि हॅन्डग्लोज न वापरता यामधून भंगार गोळा करत असल्याचं स्थानिकांना दिसलं. तसेच यामुळे कोरोना संसर्ग वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही, असंही स्थानिकांनी म्हटलं आहे. दरम्यान, नगरपरिषद अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट देताच रात्रीतून हे सर्व वेस्टेज साहित्य जाळून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न देखील अज्ञातांकडून करण्यात आला.

आरोग्य निरीक्षकाकडून हॉस्पिटलची पाठराखण?

नगरपरिषद मुख्याधिकारी स्वप्नील लगाने यांच्यासह आरोग्य निरीक्षक सुनील बेडवाल यांनी घटनेचा पंचनामा केला. यामध्ये या वेस्टेज मटेरियलमध्ये संचेती कोविड हॉस्पिटलचे पुरावे आढळले. तरीही आरोग्य निरीक्षक सुनील मात्र कुठलेही पुरावे आढळले नसल्याचे सांगत आहेत. यातून ते रूग्णालयाला पाठीशी घालत असल्याचा प्रकार दिसून येत आहे.

सर्वसामान्यांकडून कारवाईची मागणी

जिल्हा प्रशासन जिल्ह्यातील कोरोना रुग्णांची वाढती चैन खंडित करण्याच्या अनुषंगाने कठोर पावले उचलत आहे. मात्र दुसरीकडे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण करणारा हा प्रकार घडत आहे. संबंधित प्रकार हा दंडनीय अपराध असून असे कृत्य करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई व्हावी, जेणेकरून असे अपघात वारंवार घडणार नाहीत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अॅड. सतीशचंद्र रोठे यांनी केली आहे.

फरार गुन्हेगारांना शोधण्यासाठी विशेष मोहीम

चंद्रपूर, दि. ३०, (प्रतिनिधी) : फरार गुन्हेगारांना हुडकून काढण्यासाठी पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेचा बुधवारपासून शुभारंभ झाला. पोलिसांनी पहिल्याच दिवशी २५ फरार आरोपींना गजाआड केले.

पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी नुकतीच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यात १९८५पासून फरार असलेल्या गुन्हेगारांची यादी तयार करून त्यांची धरपकड करण्याचे निर्देश अमितेशकुमार यांनी अधिकाऱ्यांना दिले. अधिकाऱ्यांनी ३ हजार ६०० गुन्हेगारांची त्यांच्या संपूर्ण पत्त्यासह यादी तयार केली. ही यादी प्रत्येक पोलिस स्टेशनला देण्यात आली. त्यानुसार बुधवारपासून गुन्हेगारांच्या धरपकडीसाठी 'ड्राइव्ह' सुरू करण्यात आला. १५ ते २० दिवसांपर्यंत ही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. सर्वाधिक आरोपी पकडणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना विशेष बक्षीसही देण्यात येईल, असे आयुक्तांनी सांगितले. गंभीर गुन्ह्यांत फरार आरोपींवर अधिक लक्ष केंद्रित करण्याचे आदेशही अमितेशकुमार यांनी दिले आहेत. १९८७मध्ये दाखल दरोडा प्रकरणात फरार असलेल्या दरोडेखोरालाही बुधवारी पोलिसांनी अटक केली. परिमंडळ एकमध्ये २, दोनमध्ये ३, तीनमध्ये ९, चारमध्ये ४ व पाचमध्ये एका फरार आरोपीला अटक करण्यात आली. तर गुन्हेशाखेने सहा आरोपींना गजाआड केले.

दोन डॉक्टरसह तिघे जेरबंद ; टोसिलीझुमॅब इंजेक्शनचा काळाबाजार

नागपूर, दि. ३०, (प्रतिनिधी) : रेमडेसिविनंतर आता उपराजधानीत टोसिलीझुमॅब या इंजेक्शनचाही काळाबाजार होत असून नागपूर पोलिसांनी रविनगर परिसरात सापळा रचून दोन डॉक्टरसह तिघांना अटक केली. सचिन अशोक गेवरीकर (२०) रा.मोहगाव, जि. बालाघाट, डॉ. विशेष ऊर्फ सोनू जीवनलाल बाकट, रा. परसवाडा, जि. बालाघाट व डॉ. रामफल लोलर वैश्य (२४) रा. नरेंद्रनगर, अजनी अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

सचिन हा बीए अभ्यासक्रमाचा विद्यार्थी आहे. त्याच्या आईला करोना झाला होता. त्याच्याकडे टोसलीझुमॅब हे इंजेक्शन होते. दोघांच्या मदतीने सचिन हा इंजेक्शनची एक लाख रुपयांमध्ये विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याची माहिती पोलीस उपायुक्त विनीता शाहू यांना मिळाली. शाहू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कुणाल धुरट, हवालदार रामदास नरेकर, आशीष वानखेडे, संतोष शिंदे यांनी रविनगर परिसरात सापळा रचला. पोलिसांनी आधी सचिनला अटक केली. त्यानंतर अन्य दोन डॉक्टरांना अटक केली. तिघांविरुद्ध अंबाझरी पोलीस ठाण्यात फसवणुकीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. अंबाझरी पोलिसांनी तिघांनाही बुधवारी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांची २८ मे पर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली.

आणखी एका डॉक्टरला अटक

टोसिलीझुमॅब या इंजेक्शनच्या काळाबाजार प्रकरणात अंबाझरी पोलिसांनी आणखी एका डॉक्टरला अटक केली. या प्रकरणात अटकेतील डॉक्टरांची संख्या आता तीन झाली आहे. डॉ. फैजान खान (वय ३०, मूळ रा. बालाघाट, सध्या रा. उमरेड), असे अटकेतील डॉक्टरचे नाव आहे. तो उमरेडमधील हॉस्पिटलमध्ये काम करतो.

यापूर्वी अंबाझरी पोलिसांनी सचिन अशोक गेवरीकर (वय २०, रा. मोहगाव, जि. बालाघाट), डॉ. विशेष ऊर्फ सोनू जीवनलाल बाकट (वय २६, रा. परसवाडा, जि. बालाघाट) व डॉ. रामफल लोलर वैश्य (वय २४, रा. नरेंद्रनगर, अजनी) या तिघांना अटक केली. तिघांचीही २८ मेपर्यंत पोलिस कोठडी घेण्यात आली.

चौकशी दरम्यान फैजान याने इंजेक्शन दिल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. त्यानंतर अंबाझरी पोलिसांनी उमरेडमध्ये सापळा रचून फैजान याला अटक केली. फैजान याने आतापर्यंत सात ते आठ रेमडेसिव्हिर आणि तीन टोसिलीझुमॅबची विक्री केल्याची माहिती आहे. पोलिस उपायुक्त विनिता शाहू यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाझरी पोलिस या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

टिळकनगर इंडस्ट्रीज लि. (टीआय)

सीआयएन : L15420PN1933PLC133303

कॉर्पोरेट कार्यालय : ३ रा मजला, औद्योगिक विमा इमारत, चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र - ४०० ०२०.
नोंदणीकृत कार्यालय : पी.ओ. टिळकनगर, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर, महाराष्ट्र - ४१३ ७२०.
ई-मेल : investor@tilind.com वेबसाइट : www.tilind.com
दूरध्वनी : + ९१ २२ २२८३१७१६/१८ फॅक्स : + ९१ २२ २२०४६९०४

दि. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताच्या एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षाचा सारांश

(रु. लाखांत)

अ. क्र.	तपशील	तिमाहीअखेर		वर्षअखेर	
		३१.०३.२०२१	३१.०३.२०२०	३१.०३.२०२१	३१.०३.२०२०
		लेखापरीक्षित	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित
१	परिचालनातून एकूण उत्पन्न (अन्य उत्पन्न अंतर्भूत)	४४,९१३.४३	३७,१९१.२३	१,४२,९७८.३७	१,५१,३४०.०१
२	कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपूर्व)	(९२३.११)	७,३५९.२८	(३,८५७.८८)	(१८,३९१.४१)
३	करपूर्व कालावधीकरिता (अपवादात्मक व/वा असामान्य बाबींपश्चात) निव्वळ नफा/(तोटा)	(९२३.११)	३८,१५९.०७	(३,८५७.८८)	२७,१२६.९४
४	करपश्चात कालावधीकरिता (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीबाबींपश्चात) निव्वळ नफा/(तोटा)	(९०२.३२)	३८,०४९.६६	(३,८४०.३०)	२६,९७२.७६
५	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता (करपश्चात) नफा/(तोटा) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश)	(९२८.४०)	३८,०४९.६८	(३,८७४.८०)	२६,९५८.९१
६	समभाग भांडवल	१२,५४३.४६	१२,५१३.३८	(१२,५४३.४६)	१२,५१३.३८
७	राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळता, गत वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार)			(१८,११५.३०)	(१४,२५०.६६)
८	उत्पन्न प्रतिशेअर (प्रत्येकी रु. १०/-) (अवार्षिकीकृत)				
	अ) मूलभूत (रु.)	(०.७२)	३०.४१	(३.०७)	२१.५६
	ब) सौम्यीकृत(रु.)	(०.७२)	३०.४१	(३.०७)	२१.५६

टीपा :

१. वरील विवरण हे सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल करण्यात आलेल्या ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताच्या लेखआपरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या (स्थायी व एकत्रित) विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. दि. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताच्या वित्तीय निष्कर्षांचे (स्थायी व एकत्रित) संपूर्ण प्रारूप कंपनीची वेबसाइट (www.tilind.com) वर तसेच बीएसईची वेबसाइट (www.bseindia.com) व एनएसईची वेबसाइट (www.nseindia.com) वरही उपलब्ध आहे.

२. दि. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताचे लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष हे कंपन्या (भारतीय लेखा मानके) नियम, २०१५ (आयएनडी - एएस) कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद १३३ सहवाचन त्याअंतर्गत संस्थापित नियमांतर्गत तसेच भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारण्यात येत असलेल्या अन्य लेखा धोरणांनुसार तयार करण्यात आलेले आहेत.

३. वरील निष्कर्षांचे लेखापरीक्षण समितीद्वारे पुनरावलोकन करण्यात आले असून संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. २९ मे, २०२१ रोजी पार पडलेल्या सभेत त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांद्वारे वरील निष्कर्षांचे लेखापरीक्षण करण्यात आलेले असून दि. ३१ मार्च, २०२१ व दि. ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिताची आकडेवारी ही संबंधित संपूर्ण वित्तीय वर्षासंदर्भातील लेखापरीक्षित आकडेवारी व संबंधित वित्तीय वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीपर्यंत प्रसिद्ध वर्ष ते दिनांक आकडेवारी (अलेखापरीक्षित) दरम्यान ताळमेळ साधणारी आहे, जी बाब वैधानिक लेखापरीक्षकांच्या मर्यादित पुनरावलोकनाच्या अधीन आहे.

४. स्थायी वित्तीय निष्कर्षांची महत्त्वाची माहिती खाली दिलेली आहे :

(रु. लाखांत)

तपशील	तिमाहीअखेर		वर्षअखेर	
	३१.०३.२०२१	३१.०३.२०२०	३१.०३.२०२१	३१.०३.२०२०
	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित
परिचालनातून महसूल (जकात कर समाविष्ट)	४४,९२२.७३	३६,०९१.१६	१,४३,००६.४२	१,४९,७८३.२३
वजा - जकात कर	२४,९४५.१३	१९,०६५.४०	८६,९६१.३४	८३,०६३.०१
परिचालनातून महसूल (निव्वळ) (अन्य उत्पन्न समाविष्ट)	१९,९७७.५९	१७,०२५.७६	५६,०४५.०८	६६,७२०.२२
करपूर्व नफा/(तोटा)	(१,२६६.८६)	४०,८८१.८६	(२,९२५.१७)	३०,८७७.४८
करपश्चात नफा/(तोटा)	(१,२११.५७)	४०,७९६.३८	(२,८७९.२१)	३०,७९२.००
एकूण सर्वसमावेशक उत्पन्न/(तोटा)	(१,२३२.१६)	४०,७८८.५४	(२,९०२.३७)	३०,७७७.९१

५. वैधानिक लेखापरीक्षकांनी दि. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताच्या लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांवरील (स्थायी व एकत्रित) त्यांचे मत पुढीलप्रमाणे सुधारित केले आहे : १) आयएनडी एएस ३६ - संपत्तीची हानी या आवश्यकतांनुसार बिघाडाचे निर्देश असतानाही नियंत्रक कंपनीने एका ईएनए प्लान्ट्सची दुरुस्ती केलेली नाही. २) भारतीय लेखा मानक (आयएनडी एएस १०९) वित्तीय साधनांद्वारे आवश्यकतानुसार रक्कम रु. ६०७४.०८ लाख इतक्या रकमेच्या काही पार्टीजना दिलेल्या आगाऊ रकमेसंदर्भातील हानीची धारण कंपनीने सुधारणा केलेली नाही. ३) पंजाबएक्सपो ब्रेव्हरीज प्रायव्हेट लिमिटेड (पंजाबएक्सपो) कंपनीची पूर्णत: मालकीची उपकंपनी यांचा तिमाहीदरम्यान निव्वळ तोटा झाला व संचयित तोट्यामुळे निव्वळ संपत्ती मूल्य नकारात्मक ठरले आहे. विपरीत आर्थिकस्थिती असतानाही कंपनीने रु. १०८०.३९ लाखांच्या समभाग गुंतवणुकीत दुरुस्तीकरिता तरतुद केली तसेच आयएनडी एएस ३६ संपत्तीची हानी या अंतर्गत आवश्यकतेनुसार पंजाबएक्सपो यांना रु. ४२७८.६४ लाख इतक्या रकमेची कर्जे व आगाऊ रक्कम देऊ केली. ४) राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरणाने (एनसीएलटी) कंपनीची पूर्णत: मालकीची उपकंपनी - प्राग डिस्टिलरी (प्रा.) लि. (प्राग) या कंपनीच्या परिसमापनाचा आदेश दिला आहे. तथापि, आयएनडी एएस संपत्तीची हानी याअंतर्गत आवश्यकतेनुसार प्रागमध्ये रु. १५४३.३५ लाखांच्या समभाग गुंतवणुकीकरिता हानीकरिताची तरतूद केलेली नाही. ५) प्राग कंपनीने प्रकल्प विस्तारावर (प्रकल्प) रु.१००१०.०३ लाखांचे भांडवली खर्च केले जी बाब प्रगतीपथावरील भांडवल कार्य या शीर्षांतर्गत नोंदीत आहे. सदर प्रकल्पावरील काम स्थगित करण्यात आले होते व अनेक वर्षांपासून ते पूर्ण होऊ शकले नाही. पुढे, इमारत, प्लान्ट व उपकरणे यासंदर्भात दि. ३१ मार्च, २०२१ रोजीनुसार निव्वळ नोंदीत रक्कम रु. ८०४.७५ लाख ही प्लान्ट बंद झाल्यामुळे थकित राहिली. आयएनडी एएस ३६ - संपत्तीची हानी याअंतर्गत हानी निर्धारणाकरिता सदर प्रकल्प, इमारत, प्लान्ट व उपकरणे (मूर्त संपत्ती) यांची चाचणी केली नाही. ६) प्राग यांनी आंध्र प्रदेश बेव्हरेज कॉर्पोरेशन लि. कडून रु.५८६.५५ लाखांच्या थकित व्यापारी स्वीकारार्ह रक्कम वरु. १८२.०५ लाख इतक्या ठेवी आणि पुरवठादारांना देऊ केलेल्या रु. २१०.९१ लाख इतक्या असुरक्षित आगाऊ रकमा असुरक्षित केल्या आहेत. ज्या दीर्घकाळ थकित व वसुलीकरिता शंकास्पद आहेत. व्यवस्थापनाने दीर्घकाळ थकित असले तरीही शंकास्पद व्यापार स्वीकारार्ह बाबी (अपेक्षित पत हानी), ठेवी व आकाऊ रकमा यांवर मंजुरीकरिता कोणत्याही तरतुदीवर विचार केलेला नाही.

मंडळाच्या आदेशाद्वारे
टिळकनगर इंडस्ट्रीज लि. करिता
सही/-
अमित डहाणूकर
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ००३०५६३६

ठिकाण : मुंबई
दिनांक : २९ मे, २०२१